# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery Of Stolen Property**

**Police Station** :- **WashimCity/ LCB**

**Date of Good Work done** :- **10/03/2022**

**Brief of the work done :-**

जबरी चोरीच्या प्रकरणातील अनोळखी आरोपींचा LCB पथकाने शिताफीने शोध घेऊन तीन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचेकडून संपूर्ण 1.95 लाख रुपये चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

लोकमत

## चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद

**वाशिम :** स्थानिक रेल्वे स्टेशन परिसरात दुचाकीस्वाराकडून १.९५ लाखांचा ऐवज लंपास करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ८ मार्च रोजी अकोला येथून ताब्यात घेतले.

वाशिम येथील फिर्यादी यश अनिल सरकटे यांना २७ फेब्रुवारी रोजी अज्ञाताने फोन करून फोटो शूट करण्यासाठी जायचे आहे, असे सांगून दुचाकीने रेल्वे स्टेशन परिसरात आणले. तेथे डोळ्यात चटणी पावडर फेकून फिर्यादीचा १.७५ लाखांचा कॅमेरा आणि २० हजार किमतीचा मोबाईल जबरीने चोरून नेला होता. याप्रकरणी वाशिम शहर पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद करून आरोपीच्या शोधार्थ स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अकोला येथे रवाना करण्यात आले. अकोला येथून एक विधिसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले असता, दोन साथीदारांसह चोरीचा गुन्हा केल्याचे तपासातून समोर आले. विधिसंघर्षग्रस्त बालकाच्या सांगण्यावरून डोणगाव (जि. बुलडाणा) येथून दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेत चोरून नेलेला मुद्देमाल व मोटारसायकल जप्त करण्यात आली. उपरोक्त विधिसंघर्षग्रस्त बालकांना पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनात एलसीबीचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांच्या नेतृत्वातील चमूने पार पाडली.

Hello Washim
Page No. 1 Mar 10, 2022
Powered by: erelego.com